अग्रलेखांचा नवा काळ बादशहा

संस्थापक : नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवा काळ

।। न मे भक्त: प्रणश्यति ।।

अग्रलेखांचा नवा काळ बादशहा

# तस्करीचा सोनेरी मार्ग

सोन्याच्या किमती उतरण्याची कोणतीच लक्षणे दिसत नाहीत. उलट भारतातल्या सोन्याची मागणी लक्षात घेवून जास्तीत जास्त सोने आयात करावे लागत आहे. परंतु तेदेखील पुरेसे पडत नाही. सोने हा भारतातल्या लोकांसाठी जिव्हाळयाचा आणि आकर्षणाचा विषय ठरतो. जगातली सर्वांत मोठी बाजारपेठ म्हणूनही भारताकडे पाहिले जाते. अशावेळी प्रचंड नफा कमविण्याची चढाओढ सुरू झालेली आहे आणि आता त्याला वेगळेच वळणही प्राप्त झाले आहे. विमानतळावर लपून-छपून सोने आणल्याच्या डझनभर घटना गेल्या महिना-दीड महिन्यात घडल्या. तर आता नेपाळ आणि बांगलादेशमार्गे मोठया प्रमाणावर सोन्याची तस्करी सुरू झाल्याचे आढळून आले. याच कालावधीत नेपाळच्या सीमेवर ३० कोटीचे सोने जप्त केले गेले. भारतात सोन्याच्या आयातीवर तब्बल १० टक्के कर लावला जातो. तर दुबई, थायलंड या देशात केवळ १ टक्का कर आकारला जातो. या सर्व परिस्थितीचा फायदा घेऊन सोन्याची तस्करी करण्यात तरबेज असलेल्यांनी नेपाळ मार्गे सोने भारतात आणण्याचे उद्योग सुरू केले आहेत. सीमेपलीकडून येणारी व्यक्ती सहजपणाने एक-एक, दोन-दोन बिस्किटे आपल्या बरोबर आणू शकते आणि हीच व्यक्ती नेपाळ आणि भारत या दरम्यान कितीही फेऱ्या मारू शकते. कारण हा सीमावर्ती भाग इतका जोडला गेला आहे की, एखादे दुसरे चेकपोस्ट ओलांडले की भारताच्या सीमेत पाऊल टाकता येते. सीमेवर चालणारी सोन्याची तस्करी एका अर्थी अगदी उघडपणे होत आहे. इथे असणाऱ्या सगळया सुरक्षा यंत्रणांना त्याची माहिती असूनदेखील त्याला फारसा अटकाव केला जात नाही आणि तस्करी करणारे लोक देखील तितक्याच बेमालुमपणे सोने आणत असतात. भारतात सोने आणण्याकरिता नेपाळ-बांगलादेशचा मार्ग सर्वांत सोयीचा ठरला आहे. दिवाळीच्या काळामध्ये सोन्याचे भाव अचानकपणे वाढले यामागेदेखील तस्करीमार्गे आलेल्या सोन्याचा हात होता. हे लपून राहिलेले नाही. केवळ दीड-दोन महिन्यात ३० कोटीचे सोने पकडले जाते. याचा अर्थ त्याच कालावधीत सगळया सुरक्षा यंत्रणांची नजर चुकवून किमान १५० कोटींच्या सोन्याची तस्करी झाली असावी, असा सहजपणे अंदाज काढता येतो. म्हणजे आयात केलेल्या सोन्यापेक्षा तस्करी करून आणलेल्या सोन्याचे प्रमाण जास्त आहे, असे सिध्द होते. कारण हे सोने केवळ नेपाळ, बांगलादेश या मार्गाबरोबरच पाकिस्तान, श्रीलंका आणि मलेशिया या मार्गानेदेखील भारतात येत आहे.

### भारतीय लोकांना सोन्याचे आकर्षण

भारतीय लोकांना सोन्याचे वेड आहे. दागदागिन्यावर ते बराच खर्च करीत असतात. देशातल्या अनेक मंदिरांमध्ये दानाच्या स्वरुपात सोने अर्पण केले जाते. बडया श्रीमंताकडे होणारे लग्न समारंभ सोन्याच्या लखलखाटाशिवाय होऊच शकत नाहीत. वधू-वरांच्या अंगावर आणि दोन्हीकडच्या पाहुणे मंडळीच्या अंगावर सोन्याच्या दागदागिन्याचे प्रदर्शनच भरलेले असते. आपली श्रीमंती दाखवण्यासाठी सोन्याने मढवलेले अलंकार पाहुणे राऊळे अंगावर घालून मिरवत असतात. आजही भारतातल्या पूर्वीच्या राजघराण्याच्या वंशजांकडे होणारे लग्न सोहळे म्हणजेच सोन्याच्या दागदागिन्याचा लखलखाट ठरतो. एकीकडे श्रीमंत मंडळी सोने खरेदी करून आपले महत्त्व दाखवण्याचा प्रयत्न करतात. तर मध्यमवर्गीय माणूस देखील हल्ली बऱ्यापैकी सोने खरेदीची तयारी ठेवत असतो. एवढेच नाही तर गरिबातला-गरीबसुध्दा वेळ पडली तर घर गहाण ठेवून आपल्या मुला-मुलीच्या लग्नात एक तरी सोन्याचा दागिना घेतल्याशिवाय राहत नाही. असे सोन्याविषयीचे आकर्षण ज्या देशात आहे तिथे जास्तीत जास्त किमतीत सोने कसे विकता येईल, असा प्रयत्न कोणताही व्यापारी केल्याशिवाय राहणार नाही. तस्करीच्या मार्गाने अतिशय कमी किमतीत मिळालेले सोने भारतात पाचपट भावाने विकता येते. आता तर सोन्याचा भाव ३१ हजाराच्या जवळपास आहे. येत्या वर्षभरात तो ३२ ते३३ हजारापर्यंत पोहचेल. ही कमाई जडजवाहिऱ्याचे व्यवसाय करणारे लोक अजिबात सोडणार नाहीत. आज भारतामध्ये सोन्याचा जेवढा खप होत आहे त्यातले १०ते १५ टक्के सोने तस्करी करून आणलेले आहे त्यात कोणतीच शंका उरत नाही. तस्करीचा हा सोनेरी मार्ग बंद होणार नाहीच, उलट वेगळया पध्दतीने भारतात सोने आणण्याचे प्रयत्न चालू राहतील.

### महागाईतही वाढ

अनेक देशांच्या अर्थव्यवस्थेत सोन्याला महत्त्व असते. आज भारतात महागाई का वाढत आहे याची अनेक कारणे आहेत. त्यात सोन्याची वाढती मागणी हे एक महत्त्वाचे कारण ठरते. साधारणपणे गेल्या पाच वर्षांत सोन्याचे भाव प्रचंड वेगाने वाढले आणि याच काळात महागाई देखील तितक्याच वेगाने वाढली. शेवटी रिझर्व्ह बँकेला हस्तक्षेप करावा लागला आणि सोने आयातीवर असलेल्या करामध्ये जवळपास ६ टक्के वाढ करावी लागली. या निमित्ताने लोकांचे सोन्याचे आकर्षण कमी होईल. मागणी कमी झाल्यामुळे सोन्याचे भाव खाली येतील आणि होत असलेला चलन फुगवटा नियंत्रणात आणता येईल, असा रिझर्व्ह बँकेचा प्रयत्न होता. परंतु, आयात कर वाढल्याबरोबर सोन्याची तस्करी वाढली आणि रिझर्व्ह बँकेच्या प्रयत्नाला सोने तस्करांनी हरताळ फासला. त्यामुळे महागाई सुध्दा कमी होऊ शकलेली नाही आणि चलन फुगवट्याचा दरही रोखता आलेला नाही. याबाबत सरकारने नव्याने विचार केला पाहिजे. सोने आयातीवरचा दर कमी करून दुसरीकडे ही तस्करी रोखली पाहिजे. सरकारने कितीही प्रयत्न केले तरी भारतीय लोकांचे सोन्याचे आकर्षण कमी होणार नाही. सोने कितीही महाग झाले तरी ते खरेदी केल्याशिवाय भारतीय माणूस स्वस्थ बसू शकत नाही. उलट सोन्याचा भाव जितका वाढत जाईल तितकेच त्याचे आकर्षणही वाढेल. सोन्याशी असलेले त्याचे जिवाभावाचे नाते कायम राहणार असल्यामुळे सरकारला याबाबत कल्पकता दाखवूनच उपाय करावे लागतील. भारतातला हा सोने बाजार तस्कराच्या प्रभावाखाली जावू द्यायचा नसेल तर त्याबाबतची धोरणे विचारपूर्वक आखावी लागतील. शेवटी सोने ते सोनेच असते ते सरकारी शिक्क्याचे असो किंवा तस्करीचे असो लोकांना ते हवेच आहे.